Volume-4, Issue-6, June-2015 • ISSN No 2277 - 8160

Research Paper | History

# Sadhnatai Aamte Yanche Anandvanatil Karya

## साधनाताई आमटे यांचे आनंदवनातील कार्य

पुनम उध्दव जनबंधु

इतिहास विभाग मॉडेल कॉलेज गडचिरोली व्दारा संतोष भोवरे लांजेडा वार्ड ि.६ गडचिरोली.

ABSTRACT

वेदशास्त्र संपन्न कुटूंबातील साधनाताई आमटे त्यागी समाज सेविका म्हणून प्रसिद्ध आहेत. सुखवस्तु कुटूंबात आरामशीर जीवन व्यतीत न करता बाबाआमटे नावाचा प्रभंजन प्रत्करून सर्व सोसाट्यांशी, वेगाशी व अंगीकृत कार्यात बेहोशपणे स्वतःला झोकु दिले. श्रमाश्रमाच्या प्रकल्पापासून कार्याला सुरूवात केली.बाबा व साधनाताई आमटेंनी समाजाने बहीष्कृत केलेल्या कृष्ठरोग्यांच्या वेदनावर मायेची फुंकर घालीत त्यांच्यासोबत राहुन आांदवनाची निर्मिती केली. आांदवनाची उभारणी हे बाबा आमटेंचे कर्तुत्व असलेतरी सर्वांना बांधुन देणारी शक्ती म्हणजे साधनाताई.

KEYWORDS : सांकेतिक शब्द : आनंदवन, कुष्ठरोग, गोकुळ

### प्रस्तावना

भारतीय इतिहासाच्या पानावर श्रेष्ठ महिलांचे कार्य सुवर्णअक्षरांनी लिहिल्या गेले. या महिलांमध्ये महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्ह्याच्या वरोऱ्यातील सुप्रसिद्ध समाजसेविका साधनाताई मुरलीधर आमटे महत्वाच्या आहेत. बाबा आमटे व साधनाताई यांचे कार्य म्हणजे आनंदवनाच्या कर्तुत्वाची गाथा होय. उपेक्षित व वंचितांसाठी आनंदवनानंतर, अशोकवन, सोमनाथ, हेमलकसा, गुळगव्हाण प्रकल्प राबविले. बाबा आमटेंनी साकारलेल्या श्रमसंस्कार छावण्या, भारत जोडो अभियान, नर्मदा बचाव आंदोलन इत्यादी बाबांच्या प्रत्येक उपक्रमात व राष्ट्रसेवेत साधनाताईंनी पतीच्या खांद्याला खांदा लावून साथ दिली.

### साधनाताईंचे अल्पपरिचय

पूर्वाश्रमीच्या इंदू विठ्ठल घुले यांचा जन्म ५ मे १९२६ रोजी नागपूरमधील घुले वाड्यात झाला. घुले घराणे पूर्वी भट्ट या नावाने प्रसिद्ध होते. तसेच शिवाजी महाराजांचा राज्यभिषेक करणाऱ्या गागाभट्टाचे पूर्वज होते.[१] घुले कुटूंब अत्यंत सनातनी धार्मिक होते. इंदूचे दहाव्या वर्षी पितृछत्र हरपले. आईच्या कडक शिस्तीत त्यांना संस्कार मिळाले. लाजाळुपणा हा त्यांचा स्वभाव होता. कोणाशी फारसे बोलत नसल्याने त्यांच्या वडिलांच्या मित्राने `` इंदूचे बोलणे म्हणजे सोन्यासारखे ऐंशि रूपये तोळा ``, तसेच आई `मुकस्तंभ` म्हणायची.

१९४४ साली साधनाताई मॅट्रीक पास झाल्या. घरच्या जबाबदारीमुळे शिक्षणाला रामराम ठोकावे लागले. पोटापर्यंत रूळणारी लांब दाढी, पाठीवर लांब जटा, खांद्यावर कांबळे, खादीचे पांढरे धोतर व भगव्या रंगाचा अंगरखा अशा बाबा आमटेंच्या साधुवेशात साधनाताईंनी पहिलांल्यादा पाहिले. ``सौंदर्य हे स्त्रिचे सामर्थ्य तर सामर्थ्य हे पुरूषांचे सौंदर्य`` मानले जाते. अशा सौंदर्यावर लुब्ध होवून पहिल्याच नजरेत एकमेकांच्या प्रेमात पडले. कुटूंब अत्यंत सनातनी असतांना सामाजिक रूढीच्या चौकटीत राहून अस्पृश्य स्त्रियांना विहिरीचे पाणी काढून देणे, भिकाऱ्यांना धान्य देणे, घरातील मोलकरीणला लपून मदत करणे, यांसारख्या साधनाताईंच्या उदारमतवादी गुणामुळे, बाबा आमटे आयुष्यभर अविवाहीत राहण्याचा निश्चय केला असतांना १८ डिसेंबर १९४६ मध्ये साधनाताईंसोबत विवाह केला.

विवाहानंतर आमटे दांपत्याचे फेब्रुवारी १९४६ मध्ये नागपूरहून चंद्रपूर जिल्ह्यातील वरोऱ्याला आगमन झाले. हरीजन लोकांनी पुढाकार घेवून नंवदांपत्याचे आपल्या वस्तीत स्वागत केले. साधनाताईंनी यावेळेपर्यंत ब्राह्मणत्व पाडले होते.[२] पण ब्राह्मणत्वाचा त्याग करून अस्पृश्य स्त्रियांच्या मधोमध जावून बसल्या. दररोज संडास साफ करणाऱ्या भगिनींना हळदकुंकू लावले. अस्पृश्य स्त्रिया व मुलांना फावल्या वेळात शिकविण्याचे कार्य केले. तसेच रोज रात्री पतीसोबत हरीजन वस्तीत जावून देशभक्तीची गीत हरीजनांकडून पाठ करवून घेतले. अस्पृश्य घरी येत असल्याने दांपत्यांना घर सोडावे लागले. साधनाताईंनी पतीच्या सर्व उपक्रमात त्यांच्या पाठिशी नव्हे तर त्यांच्या बरोबर कार्य करण्याचा निश्चय केला.

### श्रमाश्रमाच्या प्रकल्पात सहभाग

ऑक्टोंबर १९४७ मध्ये बाबा आमटेंनी, श्रमाने आत्मशुद्धी होते या कल्पनेने श्रमाश्रमाची (साम्यकुल) स्थापना केली. वरोरा गावाबाहेर तत्कालीन अन्नमंत्री रा.कृ.पाटील यांच्या बंगल्यात महार, मांग, हिंदू, मुस्लिम अशा अठरापगड जातीतील लोकांना सोबत घेवून साधनाताईंनी बाबा आमटेंना पूर्णपणे साथ दिली. साम्यकुलातील स्त्रियांच्या लहान मुलांची काळजी घेणे, आजाऱ्यांची सुश्रुषा करणे, विहीरीतील पाणी काढणे, सर्वांचा स्वंयपाक करणे व झाडु विणने इत्यादी कार्य साधनाताईंनी केली. झाडु विनतांना हाताची सालटी निघत होती. श्रमाश्रमाचा प्रयोग एक-दिड वर्षनी बद पडला. या प्रयोगाविषयी साधनाताई म्हणतात, ``आजाराच्या साथीमुळे व आर्थिक ओढताणीमुळे

साम्यकुल विस्कटले. मी मात्र झाडु, फडे तयार करण्यात तरबेज झाले.`` याच सुमारास प्रा. भंसाळी यांनी भेट दिली असता स्वतः तयार केलेले दोन झाडु त्यांना भेट दिले, भंसाळी म्हणाले, " I Will try to remove dirt of society by these brooms[3]

**आनंदवनाची निर्मिती**

तुळशिराम या कुष्ठरोग्यांच्या दर्शनाने बाबा आमटेंच्या जीवनाला कलाटणी मिळाली. सेवाभावी आमटे दांपत्यांने १९४९ मध्ये `महारोगी सेवा समिती` ची स्थापणा केली. कृष्ठपिडीतांवर औषधोपचार करणे व त्यांचे पूर्नवसन करणे हे या संस्थेचे उद्दीष्ट होते. १९५१ मध्ये वरोऱ्यापासून ५कि.मी. अंतरावर चंद्रपूर-नागपूर मार्गावर ५० एकर जंगल असलेली जमिन सरकारकडून मिळाली. २१ जुन १९५१ रोजी विनोबा भावेंच्या हस्ते `आनंदवन` चे उद्घाटन झाले. सहा कुष्ठरोगी, एक लंगडी गाय व पंधरा रूपये सोबत घेवून बाबा व साधनाताईनी समाजातील उपेक्षीत व वंचितासाठी कार्य करण्यास सुरूवात केली. सुरूवातीला सहा कुष्ठरोगी व आमटे दांपत्य एकत्र राहत होते.

आनंदवनात कुष्ठरोग्यांना औषधोपचार करून कुष्ठमुक्त करण्याबरोबर त्यांना श्रमनिष्ठ केली. शेती करणे, इमारती बांधणे, सुत कातणे, विणने अशा कामात गुंतवून त्यांना आत्मनिर्भर केले. बाबांच्या शब्दात खडकाळ माळरानावर हिरवी राने डोलू लागली.

कुष्ठरोग्यांचे जीवन बाबांनी घडविले असले तरी त्यांच्या संसार मात्र साधनाताईनी उभा केला. कुष्ठरोग्यांच्या विवाहासाठी साधनाताईनी बाबाकडे प्रस्ताव मांडला. सुरूवातीला बाबांनी त्याला विरोध केला. परंतु ताईच्या प्रयत्नामुळे विवाहाला मान्यता मिळाली. १७ नोव्हेंबर १९६२ रोजी तुकडोजी महाराजांच्या हस्ते मुक्तीसदनाचे उद्घाटन झाले. कुष्ठरोग्यांचे आनंदवनात प्रेमळ संसार सुरू झाले.[४]

साधनाताई बाबांच्या कामात स्वतःला इतके झोकुन घेतले की, सकाळी उठल्यापासून तर झोपेपर्यंत सतत काम करायच्या. सकाळी उठून दुध काढणे, सर्वांचा स्वयंपाक करणे, येणाऱ्या जाणाऱ्यांचे आदरतिथ्य करणे, भांडी-धुणी करणे व महत्वाचे म्हणजे बाबांनी राबविलेल्या प्रत्येक उपक्रम यशस्वी करण्यासाठी त्या कामामध्ये व्यस्त असायच्या.

आनंदवनानंतर अशोकवन, सोमनाथ, नागेपल्ली, हेमलकसा, व गुळगव्हाण या ठिकाणी समाजातील उपेक्षीत लोकासाठी नंदनवन केले. अर्थात याचे मोठे श्रेय बाबा आमटेंच्या अर्धांगिणी म्हणून साधनाताईना जाते.[५]

**शैक्षणिक, सांस्कृतीक व राष्ट्रीय कार्य**

ग्रामिण भागातील तरूण मुलामुलींना उच्च शिक्षण घेवून त्यांना रोजगार मिळावा म्हणून १९६४ मध्ये आनंदनिकेतन कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची स्थापणा झाली. १९६५ मध्ये आनंदवन शेतकी कॉलेजचीही स्थापणा झाली. शेतकऱ्यांची मुले तंत्रशुद्ध शेतीची धडे शिकु लागली. १९६५ मध्ये अंध मुलासाठी अंध विद्यालयाची स्थापणा झाली.

१९७९ मध्ये निवृत्त नागरिकांसाठी `उत्तरायण` सुरू केला. वृद्धाश्रम नव्हता तर आपण जे जीवन जगत आलो त्याचे उत्तर शोधणारा प्रकल्प होता. १९७९ मध्येच टाकून दिलेल्या अनाथ व कुष्ठरोग्यांच्या मुलामुलींचे पालणपोषण, संवर्धन व शिक्षण करण्यासाठी `गोकूळ` संस्थेची स्थापणा केली. गोकूळ मध्ये माया, रेणुका धरती.... यांसारख्या अनाथ मुलांना ताईच्या मातृत्वाचा लाभ झाला.

३४ वे विदर्भ साहित्य संमेलन १९८३ मध्ये राम शेवाळकरांच्या पुढाकाराने आनंदवनमध्ये संपन्न झाले. संमेलनाचे अध्यक्ष गंगाधर पाणतावणे व उद्घाटक तिर्थकर लक्ष्मणशास्त्री होते. या संमेलनाचे स्वागताध्यक्ष होण्याचा मान साधनाताईंना मिळाला. ताईने दिलेल्या भाषणाने साहित्यीक म्हणून त्यांची गणना झाली.

२४ डिसेंबर १९८५ मध्ये `भारत जोडो अभियान` तसेच १९९० पासून सुरू केलेल्या नर्मदा बचाव आंदोलनातही साधनाताईंनी सहभाग घेतला. १९९३ मध्ये मुंबईत दंगलग्रस्त भागात फिरून हिंदू-मुस्लिम कुटूंबाचे सांत्वन केले. ९ जुलै २०११ रोजी साधनाताईंची प्राणज्योत मालवली.

**निष्कर्ष**

साधनाताईंनी चाकोरीबाहेरच्या जगात आपला संसार सुरू केला. आमटे दांपत्यांने अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत समाजाने वाळीत टाकलेल्या कुष्ठरोग्यांची सेवा करून त्यांना आर्थिक स्वावलंबी केले. सुरूवातीपासून तर शेवटपर्यंत पतीच्या प्रत्येक कार्यात निष्ठेने साथ दिली. हरीत क्रांतीचे जनक डॉ. स्वामिनाथन साधनाताईच्या निधनातंर म्हणाले ``बाबा आणि साधनाताई अशी जोडी या भूतलावावर होवून गेली. यावर कुणीही विश्वासू ठेवणार नाही.`` यातून साधनाताईच्या कार्याची महती लक्षात येते.

**संदर्भग्रथ सुची**


१. आमटे साधना - समिधा, पृ. ४, पॉप्युलर प्रकाशन मुंबई २०११
२. बापट भ. ग. - बाबा आमटे, पृ. ६०, राजहंस प्रकाशन पुणे, २०११
३. महाराष्ट्र टाईम्स - १६-०२-१९८६
४. आमटे साधना - पृ. ९४
५. डॉ. कासट गोविंद - साधनाताई आमटे, पृ.९ चित्रा टॉकिज अमरावती, नोव्हेंबर २०११.